# स्क्रिझोफेनिया

## स्क्रिझोफेनिया म्हणजे काय?

स्क्रिझोफेनिया हा आजार म्हणजे दिर्घकालीन मेंदू विकार आहे, ज्यामध्ये मेंदूचे कार्य पूर्णपणे विस्कळीत होते.स्क्रिझोफेनिया झालेल्या रुग्णाच्या विचार करणे, अनुभवणे आणि पर्तन करणे या सर्वच कृतींमध्ये बदल होत जातात . त्यामुळे रुग्णाला खरे काय किंवा खोटे काय यातील फरक समजत नाही . विचार स्पष्ट नसतात किंवा बोलतांना, विचार करतांना एका विषयातून दुस-या विषयात जातात.

## स्क्रिझोफेनियाचा धोका कशामुळे वाढतो?

स्क्रिझोफेनिया निश्चितपणे कशामुळे होतो हे अद्याप माहित नाही . तणावपूर्ण जीवन किंवा अपघात ही कारणे असू शकतात.

खालील बाबींमुळे स्क्रिझोफेनियाचे धोके वाढतात.

- कुटुंबातील व्यक्तीस स्क्रिझोफेनिया झालेला असणे.
- गुंगी येणारी मादक द्रव्ये (amphetamines) आणि अफुयुक्त मादक द्रव्ये (Opiates) यांचे सेवन करणे/संपर्कात येणे

## स्क्रिझोफेनिया झाल्याची लक्षणे आणि चिन्हे काय आहेत?

- संशय घेणे - रुग्णास सतत असे वाटत रहाते की कोणीतरी त्याचेवर लक्ष ठेऊन आहे असा संशय येणे.
- हरवलेपणा- प्रत्यक्षात नसलेले पहाणे, अनुभवणे, तपासणे, ऐकणे किंवा वास येणे.
- विस्कळीत विचार आणि संभाषण बोलतांना विषयाशी विसंगत विषयावर मध्येच भरकटत जाणे त्यासाठी रुग्ण स्वतःच्या कल्पना आणि आवाज वापरु शकतो.
- भावनाहीनता - चेह-यावरील भाव हरवणे आणि भावनांना प्रतिसाद न देणे
- पुढे न येणे - ठरविलेले कार्य करण्यात पुढाकार न घेणे किंवा तशी क्षमता गमावणे.
- समाजापासून दूर रहाणे- रुग्ण कुटुंबिय आणि मित्रपरिवारातील सदस्यांपासून दूर जाणे
- मानसिक लक्षणे- यामध्ये एकाग्रता नसणे स्मरणशक्ती व परिणाम होणे आणि एखादे काम ठरविणे आणि करणे यात अंतर असणे इ. परिणाम दिसतात.




## स्क्रिझोफेनियाचे निदान कसे करतात?

- मानसिक आघातांचा इतिहास अभ्यासतात, जसे शारिरिक लैंगिक आणि मानसिक छळ
- मद्य किंवा मादक पदार्थांचे सेवन करत असणे
- स्वतःचा किंवा दुस-याचा खून करावा असे वाटत असणे.

वरील प्रकारच्या प्रश्नांची योग्य उत्तरे दिल्यास डॉक्टरांस रुग्णावरील उपचाराची दिशा लक्षात येते.

## स्क्रिझोफेनिया या आजारावरील उपचारासाठी कोणती औषधे वापरली जातात?

- ॲन्टीसायकोटिक (मनोविकार विरोधी औषधे) या प्रकारच्या औषधांमुळे रुग्णाची मनोविकार दर्शक लक्षणे कमी होण्यास आणि प्रखर विरोध कमी होण्यास मदत होते, ही औषधे सुरु असतांना त्याबरोबर कंपवात (Parkinson) या आजारावर उपयुक्त औषधे दिली जातात, त्यामुळे स्नायूंचा ताठरपणा, धक्का मारणे आणि आराम नसणे या सर्व लक्षणांवर नियंत्रण करता येते.
- चिंतामुक्तीसाठीची औषधे- चिंतामुक्त करण्यासाठी आणि शांत वाटावे आणि आराम मिळावा यासाठी ही औषधे दिली जातात.
- ताणविरोधी औषधे- या प्रकारच्या औषधांमुळे तणाव कमी होतो तसेच चिंताही कमी होतात.
- मनोवस्था स्थिर करणारी औषधे- या प्रकारच्या औषधामुळे मनोवस्था स्थिर होते.
- झोप येणारी औषधे- याप्रकारच्या औषधांमुळे शांत वाटते आणि अतिशय आराम वाटतो.

## स्क्रिझोफेनियाचे धोके काय आहेत?

योग्य उपचार न झाल्यास रुग्णाची चिन्हे आणि लक्षणे वाढतात उपचारापलिकडे जातात . आजारपणामुळे उपचार लागू पडत नाहीत किंवा दूरावा येतो . त्यामुळे खाणे आणि झोपण्याच्या सवयी बदलतात. त्यामुळे इतर आतार आणि विकार उद्भावतात. स्क्रिझोफेनिया मुळे मेंदूस हानी पोहचते.

**संदर्भ :** मायक्रोमेडेक्स केअर नोट सेरीज ऑनलाईन